**मार्गदर्शक सुचना**

**जा.क्र.कृआ/वि.प्र.४/भ.धा.महो./न.क्र२३/५७/२०१३**
**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे -४११००५,**
**दि:-१९/१/२०१३**

**प्रति,**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**

---------------------------

**विषयः- भरडधान्य उत्पादन कार्यक्रम २०१२-१३ जनजागृती मोहिमेअंतर्गत धान्य व खादय महोत्सवाचे आयोजनाबाबत मार्गदर्शक सूचना**

केंद्र शासनाने भरडधान्य उत्पादन कार्यक्रम सन २०१२-१३ या वर्षाकरीता मंजूर केलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ज्वारी, बाजरी,नागली,रागी व अन्य भरडधान्य पिकांचा यात समावेश आहे. या पिकांची आधुनिक तंत्रज्ञान वापरुन क्षेत्र उत्पादकता व उत्पादन वाढविणे त्याचबरोबर धान्याची प्रतवारी,प्रक्रिया करुन प्रक्रिया मालाची निर्मिती करण्यास सहाय्य करणे, या बाबींसह प्रक्रिया मालाची माहिती व आरोग्य विषयक भरडधान्याचे महत्व याबाबत ग्राहकांमध्ये जनजागृती करणे याबाबतचा समावेश या मध्ये केलेला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाचे या योजनेतील जनजागृती कार्यक्रमास मा.आयुक्त कृषी यांनी मान्यता दिलेली आहे. या कार्यक्रमामध्ये भरडधान्य विशेषतः ज्वारी,बाजरी,नाचणी (नागली),रागी या धान्यामधील पोषणमुल्यांची उपलब्धता विचारात घेवून जनतेमध्ये त्यांचा अन्न म्हणून वापर वाढविणे हे त्यांचे प्रमुख उदि्ष्ट आहे. त्याकरीता भरडधान्याचे आहारातील महत्व व त्याची आरोग्याच्या दृष्टिने असलेली आवश्यकता या बाबींसह सर्व भरडधान्याची सर्वसामान्य जनतेला उपलब्धता करुन देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी ंपिकविलेले भरडधान्य ग्राहकांना थेट उपलब्ध करुन देण्यासाठी विविध महोत्सवांचे आयोजन करणे हा कार्यक्रम राज्यामध्ये मोठ्याप्रमाणावर गतवर्षी राबविण्यात आला. गतवर्षीचे धान्य व खादय महोत्सव आयोजनास मिळालेल्या चांगल्या प्रतिसादामुळे चालू वर्षी या धान्य व खादय महोत्सवाचे आयोजन राज्यातील सर्व ३३ जिल्हयांमध्ये आयोजीत करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

1. धान्य व खादय महोत्सवाचे आयोजन करावयाचे जिल्हे.-------सर्व ३३ जिल्हे.
2. आयोजन करावयाचा स्तरः- जिल्हास्तर : संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
3. ज्या पिकांसाठी धान्य व खादय महोत्सवाचे आयोजन करावयाचे आहे अशी पिके, ज्वारी,बाजरी,नाचणी (नागली),कोदु,कुटकी,वरई,इ. भरडधान्य
4. धान्य व खादय महोत्सवाचा कालावधी - संबंधित जिल्हयामध्ये धान्याची होणारी उपलब्धता,ग्राहकांचा धान्य साठवणुकीचा कालावधी यांचा विचार करुन ठरविण्यात यावा.

5.धान्य व खादय महोत्वाचे आयोजन

संबंधित जिल्हयाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी धान्य व खादय महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन किमान दोन महिने अगोदर करणे आवश्यक आहे. असे करीत असतांना आपल्या जिल्हयातील भरडधान्य पिकविणा-या व विक्रीकरीता साठा उपलब्ध होणा-या शेतक-यांची सूची/माहिती तयार करण्यात यावी. व अशी माहिती खालील प्रपत्रात उपलब्ध करुन घ्यावी.

| अ.क्र. | शेतक-याचे नाव | गाव | तालुका | जिल्हा | दुरध्वनी क्र. | उपलब्ध होणा-या धान्यांचे नाव | जात/वाण | विक्रीसाठी उपलब्ध होणरा धान्य साठा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

जिल्हयातील संपूर्ण माहिती वरीलप्रमाणे माहिती संकलित केल्यानंतर एकूण विक्रीसाठी उपलब्ध होणारे धान्य व त्याची बाजार मुल्यानुसार होणारी अंदाजीत किंमत याबाबतची माहिती पिकनिहाय निश्चित करावी.

१) धान्य महोत्सव आयोजन करण्याचे ठिकाण.

२) धान्य महोत्सवात ठेवण्यात येणा-या धान्यांचे अंदाजीत वजन.

३) धान्य महोत्सवातील धान्यांचे अंदाजीत विक्रीमुल्य

४) धान्य महोत्सवाचा कालावधी

५) शेतक-यांचे प्रशिक्षण, व ग्रेडिंग,पॅकिंग व वाहतूक कालावधीतील आराखडा

महोत्सवामध्ये धान्य ठेवण्याकरिता मालाचे ग्रेडींग करणे आवश्यक आहे त्याकरिता ग्रेडिंग करुन तसेच खडेविरहीत एकसारखे धान्य उपलब्ध करण्याकरिता याबाबत सुचना देण्यात याव्यात. धान्य महोत्सवात ठेवावयाचे धान्य स्वच्छ व १/५/ १०/२०/५० किलो अथवा ग्राहकांना आवश्यक अशा पॅकींग मध्ये तयार करण्यात यावे. त्याचप्रमाणे दुरगामी परिणामाच्या दृष्टिने ब्रॅन्ड (Brand)तयार करावा. उत्पादनाचे लेबल व्यवस्थित करावे त्यावर शेतक-यांचं नाव, गाव, तालुका , जिल्हा, मालाचे नाव, धान्याची जात, संपर्क मोबाईल क्रमांक, वजन (किलो) विक्री किमंत इ. महत्वाच्या सुचना यांचा उल्लेख करावा.

वरीलप्रमाणे तयार केलेला माल विक्रीकरिता धान्य महोत्सवात ठेवण्यात यावा. याबाबत केलेले नियोजन, धान्य महोत्सवातील अपेक्षित उलाढाल इ. सह संपूर्ण आराखडा तयार करुन कृषि आयुक्तालयास पाठविण्यात यावा.

आपल्या जिल्हयांमध्ये उत्पादित धान्यांना योग्य बाजारपेठ मिळण्यासाठी व ग्राहकांची गरज पुर्ण करणे यांचा समन्वय साधण्यासाठी धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे. धान्य महोत्सवाचे आयोजनाचा कालावधी ठरविताना धान्याची उपलब्धता, ग्राहकांचा धान्य साठवणूकीचा कालावधी याचा विचार करुन ठरविण्यात यावा. यासाठी खालीलप्रमाणे आराखडा तयार करण्यात यावा.

**कार्यक्रमाचे नियोजन :-**

1) जिल्हयामध्ये उत्पादन होणा-या प्रमुख धान्याची यादी करावी.धान्य महोत्सवासाठी शेतक-यांना आवाहन करावे.

२) धान्य महोत्सवाकरिता उपलब्ध होणारे धान्य विक्रीकरिता ठेवणा-या शेतक-यांची यादी.

३) उपलब्ध होणा-या धान्यांचे नमुने व विक्रीसाठी उपलब्ध साठा शेतकरीनिहाय एकत्र करुन त्यापैकी निवडक व योग्य शेतक-यांची धान्य विक्रीसाठी निवड करावी.

धान्य/खादय महोत्सव आयोजनासाठी ठिकाण अत्यंत महत्वाचे असुन ठिकाण सर्वांना(ग्राहकांना) सोयीचे मोक्याच्या ठिकाणी असावे. हे ठिकाण स्वच्छ/हवेशीर असावे.

निवडलेल्या शेतक-यांच्या धान्याची प्रतवारी करण्यात यावी. व त्याकरिता वेगवेगळया चाळण्या वापरुन मालाचे ग्रेडिंग करावे. आवश्यकता भासल्यास कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे सहकार्य घेण्यात यावे.

**प्रचार प्रसिध्दी**

वृत्तपत्र माध्यम, इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांचा वापर करुन धान्य/खादय महोत्सवाचे आयोजनाची प्रसिध्दी देण्यात यावी.या योजनेअंतर्गत प्रक्रिया पदार्थांची उपलब्ध करुन दिलेली

सीडी. पुस्तिका,जाहिराती यांचा वापर करुन धान्य व खादय महोत्सवाची प्रसिध्दी करुन जनजागृती करावी.

**खादय महोत्सव -** या धान्य महोत्सवास जोडुन खादय महोत्सव आयोजित करण्यात यावा. ज्यामध्ये या धान्यापासून बनविलेल्या विविध पदार्थांची चव ग्राहकांना घेता येईल. अशा आयोजनाकरिता विविध बचत गटांचे सहकार्य घेण्यात यावे. जेणेकरुन त्याचे महत्व ग्राहकांना आकर्षित करेल. या खादय महोत्सवाची उभारणी अत्यंत उच्च प्रतीची असणे आवश्यक आहे. खादय महोत्सवामध्ये स्वच्छता व दर्जा चांगला ठेवण्याकरिता निवडक उत्पादक / बचत गट यांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.

खादय महोत्सवामध्ये शक्यतो सर्व साहित्य (ग्लास / प्लेट इत्यादी) डिस्पोजेबल असेल असे नियोजन करावे. खादय महोत्सवाचे खादय तयार करणा-या व्यक्तीचे ड्रेस स्वच्छ व खादय महोत्सवास योग्य असे असतील याबाबतची दक्षता घ्यावी.

या महोत्सवामध्ये वापरण्यात येणारे पदार्थ चांगल्या कच्च्या मालापसून बनविलेले असतील, वापरण्यात येणारे तेलाचा दर्जा चांगला असेल असे पहावे. ज्या ठिकाणी ग्राहकांना बसण्याची व्यवस्था करावयाची आहे अशा ठिकाणची स्वच्छता राहण्यासाठी उत्पादकांनी आवश्यक तो कर्मचारी वर्ग नेमण्याबाबत दक्षता घेण्याच्या सुचना दयाव्यात. खादय पदार्थाची साठवणूक योग्य ठिकाणी करावी. त्याकरिता वापरावयाचे पाणी स्वच्छ असावे. साठवणूकीची व्यवस्था चांगली व स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी. खादय वाटप करणारे व टेबलावरील स्वच्छता करणारे यांची स्वतंत्र व्यवस्था करावी. स्वच्छता व खादय पदार्थाची चव व दर्जा उत्युत्कृष्ठ राहील यासाठी चांगल्या व उत्कृष्ठ खादयपदार्थ बनविण्या-या नावाजलेल्या व्यक्ती/ गट/ संस्था यांची निवड करावी व यादवारे जास्तीतजास्त व्यक्तीनां या पोषणमुल्य असलेल्या धान्याची गोडी ग्राहकांना लागेल व त्याचा फायदा ग्राहकांचे आरोग्य चांगले राहण्यास तसेच शेतक-यांना त्यांचे उत्पादनास योग्य बाजारपेठ मिळण्यास सहाय्यभूत ठरेल. २०१११-१२ व २०१२-१३ या वर्षात भरडधान्य

योजनेतील प्रक्रिया गटांनी तयार केलेले पदार्थ उदाः ज्वारी, रवा, इडलीमिक्स व अन्य भरडधान्याचे पदार्थ तयार करणा-या उत्पादकांना धान्य/खादय महोत्सवात प्राधान्य देवून त्यांना सहभागी होण्यास प्रवृत्त करावे. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

या धान्य महोत्सवाचे आयोजनाकरिता मा. मंत्री कृषि, मा.कृषि राज्य मंत्री, तसेच संबधिंत जिल्हयांचे पालक मंत्री, यांचे उपस्थितीत कार्यक्रम घ्यावा. जिल्हयातील खासदार, आमदार, पदाधिकारी यांना तसेच जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद),महानगरपालिका / नगरपालिका इत्यादी पदाधिकारी व अधिकारी यांना आमंत्रित करावे.

या संदर्भात केलेल्या नियोजनाचा आढावा घेण्याकरिता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी स्वतः व्यक्तीशः लक्ष पुरवावे सादर केलेल्या नियोजनाप्रमाणे भरडधान्य योजनेतील उपलब्ध अनुदानातुन आयोजनाकरिता रक्कम रुपये २.०० लाख प्रती जिल्हा याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचे जिल्हानिहाय अनुदान वाटपाचे प्रपत्र सोबत जोडले आहे.

**अनुदान उपलब्धता व खर्च**

धान्य व खादय महोत्सवाचे आयोजनाकरिता प्रामुख्याने जागाभाडे, स्टॉल उभारणी, महोत्सव साधन, सोईसुविधा,प्रचार व प्रसार इ.आयोजनाचे अनुषंगाने येणा-या खर्चासाठी करण्यात यावा.

उपलब्ध करण्यात आलेल्या अनुदानाचा उपरोक्त नमूद बाबींकरिता होणारा खर्च व त्याविषयीच्या लेखाविषयक पुर्तता व वित्तीय/नियमानुसार करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिका-यांची राहील. त्यांनी काटेकोरपणे त्याची अंमलबजावणी करावी.

उपलब्ध होणारे अनुदान राष्ट्रीय कृषी विकास योजनेतील भरडधान्य विकास कार्यक्रमांतर्गत जनजागृती कार्यक्रम या घटकांकरता सन २०१२-१३ या वर्षासाठी उपलब्ध झालेल्या अनुदानातून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदरचे अनुदान योजनेचे बँक खात्यावर स्वतंत्ररित्या आरटीजीएसद्वारे जमा करण्यात येईल. आरटीजीएसद्वारे सदरची

रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल याकरिता बँकेचे नाव,शाखा,खातेदाराचे नाव,खाते क्रमांक,आयएफएससी कोड इ.तपशिल तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावा.

खर्चाचा ताळमेळ/लेखा तपासणी इ.बाबी जिल्हा अधिखक कृषि अधिकारी यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या मार्गदर्शकसूचना व खात्याच्या सुचनानूसार पुर्तता करुन घ्यावी.

संबंधित विभागीय कृषी सहसंचालक यांनी या संपूर्ण महोत्सवाचे आयोजनाचा आढावा घ्यावा. महोत्सवाचे आयोजनाचे सनियंत्रण व समन्वय विभागीय कृषी सहसंचांलक यांनी करावे.

महोत्सवाचे आयोजनाचा भौतिक आर्थिक प्रगतीचा अहवाल सविस्तर अहवाल फोटोसह खालील प्रपत्रात देण्यात यावा. झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र खर्च होताच झाल्यावर आठ दिवसात अथवा जास्तीत जास्त ३१ मार्च २०१३ अखेर कृषी आयुक्तालयास सादर करावे.

प्रपत्र -२

| **अ.क्र** | **खादय महोत्सव** | **अंदाजे सहभागी ग्राहक संख्या** | **विक्री मालाचे नाव** | **विक्रीमुल्य** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

स्वाक्षरित/-

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

**प्रत :- १.विभागीय कृषि सह संचालक (सर्व)**

**२. सहाय्यक संचालक (लेखा) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.**

**भरडधान्य विकास कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२ - १३ करीता धान्य व खादय महोत्सव लक्षांक**

| धान्य व खादय महोत्सव | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र | जिल्हा | भौतीक लक्षांक संख्या | आर्थिक लक्षांक रुपये (लाखात ) |
| १ | सिधुदुर्ग | १ | २ |
| २ | रत्नागिरी | १ | २ |
| ३ | ठाणे | १ | २ |
| ४ | रायगड | १ | २ |
| ५ | सातारा | १ | २ |
| ६ | सांगली | १ | २ |
| ७ | कोल्हापूर | १ | २ |
| ८ | अहमदनगर | १ | २ |
| ९ | सोलापूर | १ | २ |
| १० | पुणे | १ | २ |
| ११ | लातूर | १ | २ |
| १२ | उस्मानाबाद | १ | २ |
| १३ | परभणी | १ | २ |
| १४ | नांदेड | १ | २ |
| १५ | हिगोली | १ | २ |
| १६ | नाशिक | १ | २ |
| १७ | धुळे | १ | २ |
| १८ | नंदुरबार | १ | २ |
| १९ | जळगाव | १ | २ |
| २० | बुलढाणा | १ | २ |
| २१ | अकोला | १ | २ |
| २२ | वाशिम | १ | २ |
| २३ | अमरावती | १ | २ |
| २४ | यवतमाळ | १ | २ |
| २५ | वर्धा | १ | २ |
| २६ | नागपूर | १ | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | भंडारा | १ | २ |
| २८ | गोदीया | १ | २ |
| २९ | चंद्रपुर | १ | २ |
| ३० | गडचिरोली | १ | २ |
| ३१ | औरंगाबाद | १ | २ |
| ३२ | जालना | १ | २ |
| ३३ | बीड | १ | २ |
| | एकूण | ३३ | ६६ |

स्वाक्षरित/-

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५